# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईंट,
मुंबई – ४०००२१

दूरध्वनी : २०२ ६२४०
२०२ ५३५४
२८३ ५२८७
फॅक्स : २०२ ९३४८
एसटीडी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई

Date 1/3/2001
Receiver

LAQ

जा.क्र.मजीप्रा/अ.अ.(मु.)/२००१/अ.अ. 1647 दिनांक : २८.२.२००१

**परिपत्रक क्र. ६५**

महाराष्ट्र विधान मंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन दिनांक १२.३.२००१ पासून मुंबई येथे सुरु होत आहे. या अधिवेशनाचा कालावधी संबंधितांनी सुचित केल्याप्रमाणे आठ आठवडे इतका आहे. या अधिवेशनाच्या कालावधीमध्ये मंत्रालयातून येणारे निरनिराळे तारांकित, अतारांकित प्रश्नाबरोबर लक्षवेधी कपात सूचना इत्यादींबाबत सर्वसाधारणपणे उत्तरे देण्याकरिता आपल्या कार्यालयामध्ये त्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केली असेलच, केली नसल्यास, आपल्या कार्यालयातील किमान एक जबाबदार अधिकारी व माहितगार कनिष्ठ अधिकारी व टंकलेखक इत्यादींना कार्यालयीन वेळेनंतर कार्यालयात उशीरा थांबण्यासाठी नियुक्त करावे व असे नियुक्त केलेले जबाबदार अधिकारी कार्यालयात उशिरा थांबतील असे पहावे, जेणे करुन विधीमंडळाच्या कामकाजाच्या संदर्भात निरोप देणे शक्य होईल.

1562
2/3/2001

आपण कार्यालयात नियुक्त केलेल्या जबाबदार अधिका-याचे नांव, दूरध्वनी क्रमांक इत्यादीची माहिती खाली दिलेल्या तक्त्यात भरुन अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, दुसरा मजला, सिडको भवन, दक्षिण कक्ष, नवी मुंबई-४०० ६१४ यांचेकडे पाठवावी.

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | पदनाम | कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक | कार्यालयीन दूरध्वनी / फॅक्स विस्तार क्रमांक | निवासी दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

B.E
w.e.
1/3

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अधिवेशन कालावधीत (१२ मार्च, २००१ पासून ५ मे,२००१ ) मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्याकरिता विधानसभेत बुधवार व विधान परिषदेत शुक्रवार हे दिवस नेमून दिले आहेत. संबंधित दिवसांच्या तारांकित प्रश्नांचे ब्रिफिंग प्रश्नोत्तराच्या दिवसाच्या अगोदर एक दिवस व प्रश्नाच्या दिवशी असे सर्वसाधारणपणे असते. बुधवारच्या प्रश्नांचे ब्रिफिंग हे मंगळवारी व बुधवारी, तर शुक्रवारच्या प्रश्नांचे ब्रिफिंग गुरुवार व शुक्रवार असे होईल. या खेरीज विधानसभेत, विधान परिषदेत स्वीकृत होऊन चर्चेला आलेल्या अल्प प्रश्न, लक्षवेधी प्रश्न, अर्धातास चर्चा, अशासकीय ठराव, शासकीय/अशासकीय विधेयके इत्यादिबाबतच्या प्रश्नाचे ब्रिफिंग प्रश्नोत्तराप्रमाणे घेण्यात येते. मात्र तातडतोबीची बाब असेल तेंव्हा संबंधितांनी तातडतोबीने ब्रिफिंगला जाणे आवश्यक आहे.

2/3

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता हे सर्वसाधारणपणे प्राथम्यक्रम १ ते १५ मध्ये असलेल्या योजनेबाबत तांत्रिक माहिती घेत असतात. या शिवाय संबंधित योजनेसाठी कशा प्रकारे निधीचे नियोजन केले जाते, प्रत्यक्षात तसाच निधी उपलब्ध झाला काय? झाला नसल्यास का झाला नाही व पुढील कालावधीत तो कशा प्रकारे उपलब्ध करुन देता येईल असे व यासारखी माहिती प्राप्त करुन घेत असतात. प्रश्नोत्तराच्या एक दिवस अगोदर माहिती उपलब्ध नसेल तर दुस-या दिवशी ब्रिफिंगच्या वेळी ( अधिवेशनातील प्रश्नोत्तराचा दिवस) ही माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तेंव्हा ब्रिफिंगसाठी येताना सर्व वरिष्ठ क्षेत्रिय अधिका-यांनी पूर्ण अभ्यास करुन यावा म्हणजे कनिष्ठ अधिका-यांची संख्या कमी होईल व आवश्यक तेवढयाच क्षेत्रिय अधिका-यांनी हजर रहावे. अनेक क्षेत्रिय अधिका-यांनी हजर राहण्यापेक्षा वरिष्ठ क्षेत्रिय अधिकारी व एक माहितगार कनिष्ठ अधिकारी यांनी शक्यतो ब्रिफिंगसाठी हजर रहावे. आवश्यकता असेल त्यावेळी क्षेत्रीय अधिका-यांबरोबर अधीक्षक अभियंता सी.पी.डी.एम. व वित्त शाखेतील संबंधितांनी ब्रिफिंगला हजर रहावे.

नागरी पाणी पुरवठा योजनेबाबत वार्षिक कृती योजनेमध्ये असलेली तरतूद व प्रत्यक्षात मुक्त झालेला निधी, कर्जविषयक बाबी व त्याबाबतचे प्रस्ताव यांच्या संबंधातील माहिती ब्रिफिंगच्या वेळी तयार ठेवणे आवश्यक आहे.

विधान मंडळातील तारांकित प्रश्नांच्या प्राधान्यक्रमाबाबत मंत्रालयातून माहिती मिळते. ती माहिती क्षेत्रिय मुख्य अभियंतांना तावडतोब कळविण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अधिवेशन कालावधीसाठी अधीक्षक अभियंता (मुख्यालय) यांच्या कार्यालयातील श्री.व्ही.डी.कुबल, सहाय्यक आरेखक हे दिनांक ५.३.२००१ ते अधिवेशन संपेपर्यंत मुंबई येथे हजर राहून समन्वय अधिकारी म्हणून काम पाहतील.

विधानसभा / विधान परिषदेतील तारांकित, अतारांकित प्रश्न शासनाकडून थेट क्षेत्रिय कार्यालयांना पाठविले जातात व त्याची उत्तरे मुख्य अभियंता / अधीक्षक अभियंता यांच्या स्तरावर निश्चित होऊन शासनाला थेट सादर केली जातात. सर्व क्षेत्रीय अधिका-यांना याद्वारे असे कळविण्यांत येते की, शासनाला थेट उत्तर सादर करतांना त्या उत्तराची एक प्रत अधीक्षक अभियंता (मुख्यालय) यांना अग्रेषित करावी.

( राजेंद्र सगणे )
सदस्य सचिव (तांत्रिक)

प्रत,
१) सदस्य सचिव (तांत्रिक) व (प्रशासन), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
२) विशेष कार्य अधकारी व मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई
३) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोकण-ठाणे / पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.
४) मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१
५) वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
६) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ (सर्व)
७) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (समन्वय) / (म.नि.सं.व सं. कक्ष/ गु.नि.कक्ष), मुंबई / नवी मुंबई.
८) आस्थापना अधिकारी (दक्षता), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
९) कार्यासन अधिकारी (आ-५), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
१०) संबंधित अधिकारी / कर्मचारी.

एमएमबी.२८.२.